# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.07.2025** **वार- रविवार**

---

**मनकीबात**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोची मान्यता मिळाली, ही देशवासियांसाठी अभिमानाची बाब आहे असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. आकाशवाणी वरील मन की बात या कार्यक्रमाच्या १२४व्या भागात त्यांनी आज देशावासियांशी संवाद साधला. शिवनेरी, प्रतापगडसह विविध किल्ल्यांची वैशिष्ट्य त्यांनी अधोरेखित केली; संस्कार आणि स्वाभिमानाचं प्रतिक असलेल्या या गड-किल्ल्यांना आवर्जून भेट देण्याचं आवाहन मोदी यांनी नागरिकांना केलं.

**अजितपवार**

साखर उद्योगातील विविध प्रकल्पांसाठी पुढच्या पाच वर्षात सुमारे सात हजार कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद राज्य सरकार करणार आहे, यातून साखर उद्योगाला आणखी गती मिळेल अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. पुण्यातील साखर संकुलात राज्य सरकारच्या जैव धोरणावर आधरित एक महत्वपूर्ण बैठक काल झाली; त्यावेळी पवार बोलत होते. साखर आयुक्त सिध्दाराम सालीमठ यावेळी उपस्थित होते. राज्यातील सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांच्या माध्यमातून विकसित महाराष्ट्र 2047

कार्यक्रमातंर्गत पुढच्या पाच वर्षात उसापासून 10 उपपदार्थ निर्मितीसाठी सुमारे 28 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे, असंही पवार म्हणाले .

**मेधाकुलकर्णी**

राज्यसभा खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांना संसदेतील सर्वोत्तम कामगिरीसाठी 'संसदरत्न' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते दिल्लीतील महाराष्ट्र सदन इथं नुकताच हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राईम पॉइंट फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी लोकसभा आणि राज्यसभेतील उल्लेखनीय कार्याबद्दल खासदारांना 'संसदरत्न' पुरस्कारानं  सन्मानित केलं जातं. या पुरस्कारांचं हे १५वं वर्ष आहे.

**रामनदी**

रामनदीचं प्रदूषण रोखण्यासाठी पुढील सहा महिन्यांत आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश राष्ट्रीय हरित लवादाच्या पुणे खंडपीठाने पुणे महापालिकेसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि ग्रामपंचायतींना दिले आहेत. बावधन इथले रहिवासी कुणाल घारे यांनी राष्ट्रीय हरित लवादाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी देताना लवादाने हे आदेश दिले आहेत. रामनदीत विविध ठिकाणी थेट सांडपाणी मिसळत असून नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचं  निरीक्षण लवादानं नोंदवलं आहे.

**श्रावणसोमवार**

पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर इथल्या शिवमंदिरासह विविध ठिकाणच्या शिव मंदिरांमध्ये जय्यत तयारी करण्यात येत आहे. मंदिरांची स्वच्छता, आकर्षक सजावट, तसंच भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, वाहनतळ दर्शन रांगेची व्यवस्था आदि सुविधा करण्यात आल्या आहेत.

**सेमिकंडक्टर**

भारताच्या सेमिकंडक्टर परीसंस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टिने एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागानं ‘सेमिकंडक्टर कॉन्क्लेव्ह २०२५’चं आयोजन केलं आहे. याचं उद्घाटन येत्या २९ जुलैला होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी आज दिली. शैक्षणिक संस्था आणि सेमिकंडक्टर उद्योग यांच्यातील संबंध अधिक दृढ करणं, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असं पांडे यांनी सांगितलं.

**रेव्हपार्टी**

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने काल मध्यरात्री खराडी भागातील एका रेव्ह पार्टीत धाड टाकून सात जणांना अटक केली. याठिकाणी विविध प्रकारचे अमली पदार्थ, मोबाईल आणि काही वाहनं हस्तगत करण्यात आली आहेत. गुन्हे शाखेचे उपायुक्त निखिल पिंगळे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. भेंडी, बटाटा, फ्लॉवरसह काही फळभाज्यांच्या भावात दहा ते वीस टक्क्यांपर्यंत घट झाली. पालेभाज्यांमध्ये मेथी, शेपू, चुका महागला तर चाकवत, पुदिना स्वस्त झाले. फळ बाजारात लिंबांचे दर वाढले तर अन्य फळांचे भाव स्थिर आहेत. उद्याच्या श्रावणी सोमवारमुळे फुल बाजारात उत्साहाचं वातावरण आहे; शोभिवंत फुलांबरोबरच पारंपरिक फुलांच्या भावातही वाढ नोंदवण्यात आली आहे.

**क्रॉसकंट्री**

कॅप्टन शिवरामपंत दामले स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रीय मंडळाच्या शेठ दगडुराम कटारिया हायस्कूलनं आंतर शालेय क्रॉसकंट्री स्पर्धेचं आयोजन केलं होतं. ११ वर्षाखालील गटासाठी ६०० मीटर तर, १३ आणि १५ वर्षाखालील गटासाठी १ किलोमीटर अंतराची शर्यत ठेवण्यात आली होती. यात शुभंकर पांढरे, मृगया जरांडे, शंभुराजे बाणखेले, आदिती भाड, सागर सजागाने आणि आर्या डोके यांनी आपापल्या गटांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत पुणे शहर आणि जिल्ह्यातील ७५ शाळांमधील १हजार १८० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

**हवामान**

पुणे आणि परिसरात अधून मधून पावसाच्या हलक्या सरी येत आहेत, उद्याही शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज असून घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**